
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
सकाळ

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन



कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

अतिथीगृहासमोरील व विद्यार्थी भवन येथील डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पुतळ्यास तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या आवारातील प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते हार अर्पण करण्यात आला.

या वेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. तुकाराम सरगर, डॉ. मानसिंग जगताप, डॉ. अशोक साबळे, इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. सी. ए. लगरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागप्रमुख पी. टी. गायकवाड, डॉ. पी. व्ही. अनभुले, डॉ. एम. एस. निंबाळकर यांच्यासह अधिकारी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
पुण्यनगरी

# डॉ. आप्पासाहेब पवार यांना विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या अतिथीगृहासमोरील व विद्यार्थी भवन येथील डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या पुतळ्यास, विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या पोर्चमध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. तुकाराम सरगर, डॉ. मानसिंग जगताप, डॉ. अशोक साबळे, इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. सी. ए. लंगरे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागप्रमुख पी. टी. गायकवाड, डॉ. पी. व्ही. अनभुले, डॉ. एम. एस. निंबाळकर यांच्यासह अधिकारी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात डॉ. पवार यांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठामध्ये त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या अतिथीगृहासमोरील व विद्यार्थी भवन येथील डॉ. पवार यांच्या पुतळयास तसेच विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या पोर्चमध्ये त्यांच्या प्रतिमेस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. बी. एल. पाटील, डॉ. एस. जे. नाईक, डॉ. तुकाराम सरगर, डॉ. मानसिंग जगताप, प्राचार्य जी. पी. माळी आदींसह अधिकारी, प्रशासकीय सेवक मोठया संख्येने उपस्थित होते.

31 DEC 2017 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टार्ट अप इंडियापासून... वॉटर प्युरिफायरपर्यंत

## आविष्कार संशोधन महोत्सवात विद्यार्थ्यांकडून अभ्यासपूर्ण मांडणी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आरोग्य, लोकसंख्या, छोटे उद्योग, उद्योजक व व्यापाऱ्यांची आर्थिकसमावेशनाची सद्यस्थिती, आयुर्वेदिक वनस्पती, वृद्धांच्या समस्या, प्रोटिनयुक्त खाकरा, पूल दुर्घटना टाळण्यासाठीचा अलार्म, वीज बचत अशा विविध पोस्टर्स व प्रकल्पांच्या सादरीकरणातून विद्यार्थ्यांनी संशोधनाचा 'आविष्कार' उलगडून दाखविला. स्टार्टअप इंडिया, कामगारांचे वेतन, शिक्षणावरील खर्चाची बदलती पद्धत अशा विविध विषयांची विद्यार्थ्यांनी संशोधन व अभ्यासपूर्ण मांडणी केली.

शिवाजी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर पातळीवरील आविष्कार २०१७-१८ संशोधन महोत्सव विद्यापीठाच्या लोककला सभागृहात झाला. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागाच्या वतीने आयोजन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन झाले. महोत्सवातील विविध प्रकल्पांची कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी चिकित्सकपणे माहिती घेतली.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. अधिष्ठाता डॉ.पी.एस. पाटील, डॉ. टी. डी. डोंगळे यांनी महोत्सवाचे संयोजन केले. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हानिहाय आणि विद्यापीठात झालेल्या महोत्सवातील प्रत्येक गटातील तीन विजेत्यांची निवड मध्यवर्ती महोत्सवासाठी होणार आहे. शुक्रवार (दि. ५) जानेवारीस हा महोत्सव विद्यापीठात होणार आहे, अशी माहिती डॉ. गुरव यांनी दिली.

विनायक साळोखे याने खडी-माती, कॉटन कापडाच्या माध्यमातून बनविलेला होममेड वॉटर प्युरिफायरचे तंत्रज्ञान मांडले. 'सायबर'मधील शिक्षिका श्रद्धा कुलकर्णी यांनी बाजरी, बेसन आणि गव्हाच्या पीठातून साकारलेला प्रोटिनयुक्त खाकरा याची माहिती दिली. तासगावमधील पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालयातील एम. ए. भूगोलच्या विद्यार्थ्यांनी पुलावरील दुर्घटना टाळण्यासाठी सावध करणारी अलार्म यंत्रणेचा वेगळा प्रकल्प सादर केला.

जनसंपर्क कक्ष
31 DEC 2017 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आविष्कार संशोधन महोत्सव उत्साहात

कोल्हापूर
शिवाजी विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर पातळीवरील आविष्कार २०१७–१८ संशोधन महोत्सव लोककला केंद्रात उत्साहात पार पडला. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी अधिविभागामार्फत आयोजित महोत्सवाचे उद्घाटन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

महोत्सवात पदवी, पदव्युत्तर, संशोधक, विद्यार्थी, प्राध्यापक सुमारे २०० संशोधक स्पर्धकांनी सहभाग घेतला. मानव्यशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र, वाणिज्य, व्यवस्थापन आदी गटांमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. आरोग्य, लोकसंख्या, छोटे उद्योग, उद्योजक व व्यापाऱ्यांची आर्थिक समावेशनाची सद्यस्थिती, आयुर्वेदिक वनस्पती, वृद्धांच्या समस्या अशा विविध विषयांवर आधारित पोस्टर व प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. टी. डी. डोंगळे प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
सकाळ

# विद्यापीठात विद्यार्थी भवनात संविधान प्रबोधन महोत्सव

कोल्हापूर, ता. ३० : मानवतेचा धर्मग्रंथ म्हणजे भारतीय संविधान होय, असे प्रतिपादन प्रा. विजय काळेबाग यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनमध्ये संविधान प्रबोधन महोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी भोगावती महाविद्यालयाचे इंग्रजी विभागप्रमुख प्रा. विजय काळेबाग बोलत होते. विद्यार्थी भवन विभागाचे सहायक अधीक्षक डॉ. मानसिंगराज निंबाळकर अध्यक्षस्थानी होते.

प्रा. काळेबाग म्हणाले, की जोतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अखंड मानवतेसाठी लढा दिला आणि समता, स्वातंत्र्य, बंधुत्व ही तत्त्वे अमलात आणली. त्यांचा विचारच देशाला बलवान बनवू शकतो. विद्यार्थी भवन अधीक्षक प्रा. डॉ. एस. डी. शिंदे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. महेश बनसोडे, मोरेश्वर अस्वले, सागर धबधबे, शुभांगी बरगडे, कोमल अस्वले यांनी स्वागत केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. बिरू वगरे यांनी सूत्रसंचालन केले. नीलम पाटील यांनी आभार मानले. निर्मिती संवादचे अध्यक्ष अनिल म्हमाणे, माजी विद्यार्थी संघाचे प्रमुख डॉ. प्रवीण कोडोलीकर यांची उपस्थिती होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
पुढारी



**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी पात्र शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक-संघव्यवस्थापक.**

# विद्यापीठाचा हॉकी संघ राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर : क्रीडा प्रतिनिधी**

गुजरात टेक्नॉलॉजी विद्यापीठ आयोजित पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करत शिवाजी विद्यापीठ संघाने अखिल भारतीय · आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी आपली पात्रता सिद्ध केली.

बडोदा येथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठ मैदानावर स्पर्धा झाली. यात कोल्हापूरचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिवाजी विद्यापीठ संघाने पहिल्या सामन्यात जनार्दन रेन राजस्थान विद्यापीठ उदयपूरचा २-० असा पराभव केला.

दुसऱ्या सामन्यात गुजरात टेक्नॉलॉजी विद्यापीठ अहमदाबाद संघाचा ७-० असा असा धुव्वा उडविला. तिसऱ्या सामन्यात सौराष्ट्र विद्यापीठ राजकोटवर ७-१ अशी मात केली. अंतिम सामन्यात बरकतुल्ला विद्यापीठ भोपाळ संघाला ३-० अशी मात केली.

विजयी संघात कर्णधार शुभम सुतार, सचिन भोसले, सौरभ सावंत, अवधूत पाटील, सुरज काळे, विनय नरेकर, निहाल मणेर, पद्मराज शिंदे, रोहन पवार, सौरभ सुतार, अक्षय पाटील, अभिषेक लगारे, अनिकेत अडगळे, प्रवीण गायकवाड, गणेश पाटील, संकेत तोरळेकर, रोहित रेडेकर, ओंकार पाटील यांचा समावेश आहे.

सर्वांना प्रशिक्षक रणजित इंगवले, व्यवस्थापक विकास जाधव, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

# सामंजस्य करार ठरला दुवा

तंत्रज्ञानाच्या मदतीने अधिक कार्यक्षम होत विद्यार्थ्यांना संशोधनासाठी पोषक वातावरण देणारे काही महत्त्वाचे सामंजस्य करार शिवाजी विद्यापीठाने आंतरराष्ट्रीय संस्थांशी केले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक फायदा होणार आहे. वर्षभरात झालेल्या करारांमुळे संशोधनाचे पूल जोडले जात आहेत, तर आदानप्रदान या संकल्पनेतून विद्यापीठातील काही विद्यार्थी परदेशातील विद्यापीठांमध्ये अभ्यासासाठी गेले आहेत. सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मुंबई अर्थात 'सीडीएसएल'सारख्या महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसमवेत विद्यापीठाच्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजिटल वाटचाल अधिक जोमाने सुरू झाली. अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील १७ वे विद्यापीठ ठरले आहे

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2017
महाराष्ट्र टाईम्स

Tweet : @anuradhakadamMT

नव्या विद्यापीठ कायद्यान्वये प्रथमच शिवाजी विद्यापीठाच्या झालेल्या सिनेट निवडणुकीत झालेले सत्तांतर, जिल्हा मुख्याध्यापक संघाच्या तब्बल ४९ वर्षांतील एकहाती सत्तेला सुरुंग लावत करण्यात आलेला सत्ताबदल, विविध मागण्यांसाठी केलेली शिक्षकांची आंदोलने केजी टू पीजी या शिक्षण वर्तुळात यंदा चांगल्याच चर्चेच्या ठरल्या. या वर्षात आंदोलनासाठी रस्त्यावर उतरलेल्या शिक्षकांच्या संघटनांनीही शिक्षकांवरील अन्यायांकडे सरकारचे लक्ष वेधले. शिवाजी विद्यापीठाने केलेल्या अनेक आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारांमुळे नव पूल जोडले गेले. तर आंतरराष्ट्रीय शैक्षणिक प्रकल्पासाठी देशातील ग्रामीण विद्यापीठाचे नेतृत्व करण्याची जबाबदारी शिवाजी विद्यापीठाकडे सोपवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. विजया चौगुले या विद्यार्थिनीला करण्यात आलेल्या जीवघेण्या शिक्षेच्या निमित्ताने शाळेतील वातावरण हा नवा मुद्दा चर्चेला आला.

## शैक्षणिक

### शिवाजी विद्यापीठाची ग्लोबल झेप

'भारतीय उच्चशिक्षण व्यवस्थेत गुणवत्तेचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याच्या दृष्टीने भारताने युरोपियन युनियन या आंतरराष्ट्रीय शैक्षणिक गुणवत्ता क्षेत्रातील मान्यताप्राप्त संस्थेसमवेत संयुक्त सहकार्य प्रकल्प हाती घेतला आहे. यासाठी भारतातर्फे 'नॅक' (बंगळुरू) समन्वयक आहे. भारतातर्फे निवडलेल्या आठ शैक्षणिक संस्थांमध्ये येथील शिवाजी विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे'

